# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-07.04.2026** **वार- मंगळवार**

---

**मंत्रिमंडळ निर्णय**

राज्य शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनायाचं रुपांतर; इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालयात करण्यात येणार आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. मंत्रालयीन विभाग, आयुक्त कार्यालय आणि सर्व जिल्ह्यांसाठी कायमस्वरुपी पदांचा समावेश असलेला नवीन माहिती तंत्रज्ञान संवर्गही निर्माण केला जाणार आहे. या निर्णयामुळे राज्यातील माहिती तंत्रज्ञान, एआय, आणि डीजिटल गव्हर्नन्सला गती मिळणार आहे.

महावितरण अर्थात महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीची आर्थिक पुनर्रचना करण्याचा निर्णयही या बैठकीत घेण्यात आला. महावितरण कंपनी भांडवली बाजारात सूचिबद्ध करण्याचा तसंच शासन हमी असलेल्या 32 हजार 679 कोटी रुपयांच्या कर्जासाठी भांडवली बाजारात सरकारी रोखे आणण्याचा निर्णयही आजच्या बैठकीत घेण्यात आला.

आपत्ती व्यवस्थापनात खासगी भांडवलाच्या मदतीने वित्तपुरवठा उभारण्यासाठी महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम राबवायलाही मंत्रिमंडळान मंजुरी दिली. यासाठी जागतिक बँकेकडून 165 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होणार आहे. आपत्तीग्रस्तांना गृहकर्जात तसंच सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योजकांना कर्जात सवलत आणि विमा सुरक्षा उपलब्ध होणार आहे.

त्याशिवाय राज्यात रिमोट सेन्सिंग ॲप्लिकेशन सेंटरचं रुपांतर आता कंपनीत करण्यात येईल. त्यामुळे रस्ते माहिती प्रणाली, नगररचना, जलयुक्त शिवारसह नियोजन विभागातल्या विविध क्षेत्रांच्या अभ्यासाला गती मिळणार आहे. भूस्थानिक तंत्रज्ञानाचा वापर करून प्रशासनात गतिमानतला आणण्यासाठी महाराष्ट्र जिओटेक्नॉलॉजी ॲप्लिकेशन सेंटर स्थापन करण्यात येणार आहे.

राज्यात गेल्या वर्षी ऑक्टोंबर ते डिसेंबर या कालावधीत झालेल्या अवकाळी पावसाच्या नुकसानीपोटी 1 लाख 80 हजार 574 शेतकऱ्यांना 128 कोटी 65 लाख रुपयांची मदत देण्यात आल्याची माहिती या बैठकीत देण्यात आली. यावर्षी जानेवारीपासून झालेल्या अवकाळी पावसाने राज्यात पिकांचं मोठं नुकसान झालं आहे; त्याच्या पंचनाम्याची कार्यवाही सुरू असल्याचं राज्य शासनातर्फे सांगण्यात आलं.

**माझं गाव,आरोग्य संपन्न गाव**

राज्यातील ग्रामीण जनतेला दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने राज्य शासनाच्या “माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव” या महत्त्वाकांक्षी अभियानाचा प्रारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज करण्यात आला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्यासह मंत्रिमंडळातील मंत्री यावेळी उपस्थित होते. या अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण महाराष्ट्रातील आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम, रोगमुक्त आणि स्वयंपूर्ण करण्याचा राज्य सरकारचा संकल्प आहे. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या गावांना “आरोग्यसंपन्न गाव” म्हणून गौरवण्यात येणार आहे.

**आरोग्य दिन**

जागतिक आरोग्य दिनानिमित्त आज पुण्यात आरोग्य विषयक उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. विज्ञानाच्या सोबतीनं आरोग्यासाठी एकत्र येऊ या अशी यावर्षीची आरोग्य दिनाची संकल्पना आहे.

**इंधन पुरवठा**

देशात इंधन आणि गॅसचा पुरवठा सुरळीत असून सर्व पेट्रोल पंपांवर पेट्रोल वितरण सुरू असल्याचं पेट्रोलियम मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे. पश्चिम आशियातील तणावाच्या पार्श्वभूमीवर आज नवी दिल्लीत आंतर मंत्रालयीन पत्रकार परिषद घेण्यात आली. यावेळी पेट्रोलियम मंत्रालयाच्या सहसचिव सुजाता शर्मा यांनी ही माहिती दिली. देशातील व्यावसायिक एलपीजीचा पुरवठा पूर्ववत झाला असून स्थलांतरित कामगारांना दिल्या जाणाऱ्या पाच किलोच्या FTL एलपीजी सिलेंडरचं वितरण दुप्पट करण्यात आल्याचं शर्मा यांनी सांगितलं.

**पिंपरी-चिंचवड महापौर**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने प्रत्येक सर्वसाधारण सभेत शहरातील एका कलाकाराचा विशेष सत्कार केला जाणार आहे, अशी माहिती महापौर रवी लांडगे यांनी दिली. अनेक ज्येष्ठ कलाकारांनी दीर्घ काळ योगदान देऊन पिंपरी-चिंचवड शहराची सांस्कृतिक ओळख अधिक भक्कम केली आहे. अशा कलाकारांच्या कार्याचा गौरव करणं ही महापालिकेची सामाजिक  सांस्कृतिक जबाबदारी आहे, या माध्यमातून नव्या पिढीलाही प्रेरणा मिळेल, असं लांडगे यांनी सांगितलं.

**पुरस्कार**

साप्ताहिक 'विवेक'चे माजी संपादक दिवंगत राजाभाऊ नेने यांच्या स्मरणार्थ दिला जाणारा या वर्षाचा 'राजाभाऊ नेने स्मृती पुरस्कार' ज्येष्ठ पत्रकार विराग पाचपोर आणि 'विश्व संवाद केंद्र'च्या संपादक अंजली तागडे यांना जाहीर झाला आहे. येत्या 13 एप्रिल रोजी मुंबईत हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पश्चिम क्षेत्र प्रचार प्रमुख प्रमोद बापट यांच्या हस्ते हे पुरस्कार प्रदान केले जातील. स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ आणि 25 हजार रुपये असं या पुरस्काराचं स्वरूप आहे.

**पीएमआरडीए**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीत बेकायदा आणि धोकादायक जाहिरात फलकांवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे. महानगर आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी याबाबतचे आदेश अतिक्रमण निर्मूलन विभागाला दिले आहेत.

**प्रकाशन**

चिंचवड इथल्या लेखिका कल्पना बंब यांच्या  "शब्दांशी जोडले नाते" या पुस्तकाचं प्रकाशन नुकतंच झालं. इयत्ता नववी आणि अकरावीच्या काही विद्यार्थ्यांच्या हस्ते हा प्रकाशन सोहळा पार पडला.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 36 तर किमान तापमान 19 पूर्णांक 8 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही साधारण असंच तापमान राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी 6 वाजता ताज्या पुणे वृत्तांतसह. नमस्कार**